# बृहनमुंबई महानगरपालिका

**बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास करणा-या दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षणासाठी दिव्यांग संस्थाकडून स्वारस्याची अभिव्यक्तीद्वारे प्रस्ताव मागविण्याबात.**

**<u>सूचना</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त (नियोजन) दिव्यांग व्यक्तींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असतात. सदर योजनेचा लाभ प्रत्येक दिव्यांग गरजू व्यक्तीं पर्यंत योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रहिवास करणाया दिव्यांग व्यक्तींची सर्वेक्षण करणे प्रस्तावित आहे.

1) स्वारस्याची अभिव्यक्ती अंतर्गत दिव्यांग संस्था / संघटनांसाठी परिशिष्ट-अ खालील ठिकाणी उपलब्ध आहे.
2) अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख १३.०१.२०२१ व वेळ ५.३० वाजे पर्यंत ठिकाण - सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांचे कार्यालय ,राजगृह कोहौसिंग ,ऑप-.न.एस.सी,सोसायटी८३७ एलफिस्टन ,बाळाशेठ मडुळकर मार्ग ,पहिला मजला , मुंबई .(प)४०० ०१३. कागदपत्रे बंद लिफाफा मध्ये सादर करावीत.
3) दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणासाठी स्वारस्याची अभिव्यक्तीद्वारे माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थाळावर उपलब्ध असून, आवश्यकता भासल्यास स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी दिलेली मुदत एक किंवा अधिक वेळासाठी वाढवू शकते.
4) महानगरपालिका स्वारस्याची अभिव्यक्तीद्वारे प्राप्त झालेल्या दिव्यांग संस्था संघटनांची यादी तयार करुन, सदर कामासाठी स्थापन केलेल्या छाननी समितीकडे सादर करेल.

# स्वरस्याची अभिव्यक्तीच्या अटी व शर्ती

**<u>पार्श्वभूमी:</u>** बृहन्मुंबई महानगरपालिकेने क्षेत्रातील दिव्यांगांना जेंडर बजेट अंतर्गत ५ टक्के निधीतून विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने दिव्यांगाची संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने प्रत्येक दिव्यांगापर्यंत योजनांचा लाभ मिळून देण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे. दिव्यांगांची विस्तृत माहिती सर्वेक्षणव्दारे जमा केल्यास महानगरपालिका क्षेत्रातीत सर्व दिव्यांगाना त्याचा लाभ पोचवता येईल. यासाठी दिव्यांगाची विस्तृत माहिती दिव्यांगा संघटनां मार्फत जमा केल्यास ती दिव्यांगाच आर्थिक व सामाजिक पूर्णवसन करण्यास उपयुक्त ठरेल. सदर सर्वेक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव मा. आयुक्तांनी मंजुर केला असून सहाय्यक आयुक्त (नियोजन) खात्या तर्फे त्याचे पर्यवेक्षण केले जाईल.

**<u>कामाचे स्वरुप:</u>** म.न.पा.च्या २४ विभाग कार्यक्षेत्रात दिव्यांगाचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून इकोनोमीकल जीओग्राफिकल महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगाची अधायावत माहिती जमा करणे.

**<u>सर्वेक्षण करण्या-या संस्थांची भूमिका</u>**

1) महानगरपालिकेच्या कार्याक्षेत्रातील २४ विभागामधील दिव्यांगाचे सर्वेक्षण करणे.
2) दिव्यांगाचे नाव व पत्ता, वडीलाचे नाव व पत्ता, वय, लिंग, कुंटुबातील सद्यस्याची संख्या, शिक्षण, दिव्यांगत्वाचा प्रकार, दिव्यांगाचे प्रमाणपत्र व टक्केवारी, प्रमाणपत्र देण्या-या सक्षम अधिका-याचे नाव, हुदा व तपशिल, दारिद्रय रेषेचा क्रमांक, आधार कार्ड नंबर.
3) केंद्र शासन / राज्य शासन निराधार व इतर योजनांचा लाभ धारक आहेत का ?
4) शासन योजने अंतर्गत घरकुल मिळाले किंवा नाही.
5) नोकरी / व्यवसाय माहिती
6) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण जेंडर बजेट अंतर्गत कोणत्या योजनांचा लाभ घेतला आहे.
7) दिव्यांग बचत गटांमध्ये सहभागी आहे किंवा नाही.
8) संस्थेने संबंधित सर्वेक्षित दिव्यांग व्यक्तींची प्रश्नांवली बनविणे अपेक्षित आहे. (डीजीटल)

## दिव्यांग सर्वेक्षण संस्थासाठी पूर्व अटी

दिव्यांग संस्था / संघटना ही धर्मदाय आयुक्तालय यांच्याकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. सदर नोंदणीचे प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करताना जोडणे आवश्यक आहे.

1. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कार्यारत दिव्यांग संस्था / संघटना यांना प्राधान्य देण्यात येईल.
2. दिव्यांग संस्था / संघटना यांना बृहन्मुंबईतील कार्यक्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
3. दिव्यांग संस्था / संघटना यांना सर्वेक्षणाकरिता पुरेसा प्रशिक्षित कर्मचारीवर्ग, सर्वेक्षणासाठी लागणारे पुरेसे साहित्य असणे आवश्यक आहे.
4. दिव्यांग संस्था / संघटना यांची वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २५.०० लाखांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.
5. अर्जासोबत दिव्यांग संघटना / संस्थांनी मागील तीन वर्षाचा ऑडिट रिपोर्ट सादर करावा.
6. दिव्यांग संस्था / संघटनांनी सर्वेक्षणाबाबतचा अनुभव असल्यास अर्जासोबत सादर करावा.
7. नियुक्त झालेल्या संस्थेबरोबर म.न.पा. अधिनियम कलम ७० (१) (ब) नुसार लेखी करार करणे बंधनकारक राहिल.

## निवड प्रक्रिया

दिव्यांग सर्वेक्षणासाठी प्राप्त झालेल्या संस्थांची निवड, निवड समितीद्वारे करण्यात येईल. निवड समितीमध्ये खालील विभागांचा समावेश असेल.

1) मा. उप आयुक्त (म.ख.खा.) - अध्यक्ष
2) प्रमुख लेखापाल (वित्त) - सदस्य
3) सहाय्यक आयुक्त (नियोजन) - सदस्य
4) चाचणी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी - सदस्य
5) विधी अधिकारी - सदस्य

## तांत्रिक मूल्यमापन

संस्थांचे मूल्यमापन उपरोक्त निवड समितीमार्फत करण्यात येईल.

1) धर्मदाय आयुक्तांले यांच्यकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र - 30 गुण
2) आर्थिक उलाढाल रु. 25.00 लाखापर्यंत असल्याचा लेखापरिक्षण अहवाल - 20 गुण
3) मागील 3 वर्षांचा लेखा परिक्षण अहवाल – 20 गुण
4) संस्थांना / संघटनांना सर्वेक्षणाचा अनुभव व संस्थेकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती - 20 गुण
5) संस्थांना बृहन्मुंबई महापालिकेच्या यापूर्वी केलेल्या कामाचा अनुभव प्रमाणपत्र - 10 गुण

**परिशिष्ट – अ**

| अ.क्र. | तपशिल | संस्थेची माहिती |
|---|---|---|
| 1 | सर्वेक्षण संस्था / संघटनाचे नांव -<br>नोंदणीकृत कार्यालयीन पत्ता -<br>ई-मेल -<br>दूरध्वनी क्र. -<br>फॅक्स क्र. -<br>संकेतस्थळ - | |
| 2 | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव<br>दूरध्वनी क्र.<br>ई-मेल | |
| 3 | संस्थेचे / संघटनेचा नोंदणीचा तपशिल (प्रमाणपत्र जोडावे) | |
| 4 | तीन वर्षांचा ऑडीट रिपोर्ट (प्रमाणपत्र जोडावे) | |
| 5 | संस्था / संघटना मध्ये उपलब्ध कर्मचा-यांची संख्या व माहिती | |
| 6 | यापूर्वी केलेल्या कामाबाबतचे प्रमाणपत्र | |
| 7 | दिव्यांग संस्था / संघटना यांची वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २५.०० लाखांपेक्षा अधिक असल्याचे लेखा अधिकारीचे प्रमाणपत्र. | |